ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १९ | पुणें, बुधवार तारीख १५ जुलै, १९५३ | अंक २८

## विविध माहिती

**राज्य-सरकारांची फिनॅन्शिअल कॉर्पोरेशन्स**—भारतामधील सात राज्य सरकारें फिनॅन्शिअल कॉर्पोरेशन्स स्थापण्याचा विचार करीत आहेत, तीं अशीः मुंबई, उत्तर-प्रदेश, त्रावणकोर-कोचीन, हैद्राबाद, म्हैसूर, प. बंगाल व सौराष्ट्र.

**इंडियन सायन्स काँग्रेस**—इंडिअन सायन्स काँग्रेसचें ४१ वें अधिवेशन हैद्राबाद येथें २ ते ७ जानेवारी, १९५४ रोजीं भरणार आहे. भारताच्या निरनिराळ्या भागांतून २,००० प्रतिनिधी अधिवेशनाला उपस्थित रहाणार आहेत. त्याशिवाय कांहीं परदेशी पाहुणेहि येणार आहेत असें समजतें. स्वागत-समितीच्या अध्यक्षपदीं डॉ. भगवंतम् हे आहेत.

**संगमरवरी दगडांत रामायण कोरणार**—बनारस येथें एक नवीन देऊळ बांधण्यांत येणार असून त्यांत तुळशीदासाचें रामायण संगमरवरी दगडावर कोरून बसविण्यांत येणार आहे असें समजतें. देवालयाच्या जागेसाठी शहराच्या मध्यभागीं असणाऱ्या भागांत तपास करण्यांत येत आहे.

**प. बंगालमध्यें नवें वीजकेंद्र**—उत्तर बंगालमधून वहाणाऱ्या जलधाका ह्या नदीवर जागोजाग धरणें बांधून प्रवाहावर वीज उत्पन्न करण्याच्या एका योजनेचा प. बंगाल सरकार विचार करीत आहे. योजनेला ३ कोटी रुपयांच्यापेक्षा अधिक खर्च येईल. एकूण ६ धरणें बांधण्याचा कार्यक्रम आहे. प्रत्येक धरणावर १०,००० किलोवॅट वीज उत्पन्न करण्याचा विचार आहे.

**इजिप्तमधील क्रांतीचें चित्रीकरण**—इजिप्तचे माजी राजे फरूक ह्यांना पदच्युत करून जनरल नगीब ह्यांनीं जी क्रांति घडवून आणली तिचें चित्रीकरण करण्याची परवानगी दोन परदेशी चित्रपट कंपन्यांनीं इजिप्तच्या सरकारकडे मागितली आहे. क्रांतीच्या पहिल्या वर्षदिनाच्या दिवशीं हा चित्रपट दाखविण्याचा कंपन्यांचा हेतु आहे.

**जपान-अर्जेंटायना व्यापारी करार**—जपान आणि अर्जेंटायना ह्यांनीं ऐनजिनसी अदलाबदलीचा व्यापारी करार केला आहे. जपान अर्जेंटायनाला १·२ कोटी डॉलर्स किंमतीचें पोलाद देऊन त्याच्या बदला लोकर घेणार आहे. ह्या व्यवहारासाठी परकीय हुंडणावळ विकत घेण्यास जपानी व्यापाऱ्यांना ९ महिन्यापुरती परवानगी देण्यांत आली आहे.

**राजकन्या मोलकरीण झाली**—जपानच्या राजघराण्यांतील एक राजकुमारी आणि सध्याच्या जपानच्या सम्राटाची मेव्हणी टोकिओजवळच्या समुद्रकिनाऱ्यावरील हॉटेलमध्यें काम करीत आहे. सर्वसामान्य स्त्रियांप्रमाणें उपयुक्त काम आनंदानें करण्याचा आपला हेतु आहे म्हणून आपण मोलकरणीचें काम पत्करलें, असें त्या म्हणतात.

**'बावला' चित्रपटाची विक्री**—एम्. पी. प्रॉडक्शन्सचा 'बावला' हा बंगाली चित्रपट एका पोलिश कंपनीनें विकत घेतला आहे. चित्रपटाची गोष्ट पोलिश भाषेंत सांगणाऱ्या पाट्या चित्रपटाला जोडण्यांत आल्या आहेत. हा चित्रपट भारतांत भरविण्यांत आलेल्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या वेळीं दाखविण्यांत आला होता. चित्रपट ८५० पौंडांना विकण्यांत आला.

**डॉलर्सच्या प्राप्तीसाठीं धडपड**—१९४७ सालीं ब्रिटिश ऑस्टिन मोटार कंपनीनें ९०,००० डॉलर्स खर्चून अमेरिकेंत व कानडांत दुय्यम कारखाने काढले होते. तेव्हांपासून ह्या छोट्या कारखान्यांनीं ब्रिटनला १० कोटी डॉलर्सची कमाई करून दिली आहे.

**पदार्थविज्ञानावरील ग्रंथाला बक्षिस**—अणूंची रचना आणि त्यांचें स्वरूप ह्या विषयावरील सर्वोत्कृष्ट तात्त्विक अगर प्रायोगिक ग्रंथाला भाभा मेमोरिअल ट्रस्टनें बक्षिस देण्याचें ठरविलें आहे. ग्रंथकाराचें वय ३० जुलै, १९५४ रोजीं ४० च्या आंत असलें पाहिजे. तो अर्थात्च हिंदी नागरिक असला पाहिजे.

**उत्तर-प्रदेशांतील वीज-केंद्र**—उत्तर-प्रदेशांत गंगा नदीवर बांधण्यांत येणाऱ्या वीज उत्पन्न करणाऱ्या धरणाचें बांधकाम १९५४ च्या ऑक्टोबरमध्यें पुरें होईल असा अंदाज करण्यांत आला आहे. धरण पूर्ण झाल्यावर राज्याच्या प. भागाला २०,४०० किलोवॅट वीज पुरवतां येईल.

**राजस्थानमधील रेडिओ केंद्रें**—राजस्थानमध्यें उभारण्यांत येणाऱ्या दोन रेडिओ केंद्रांपैकीं एक जयपूर येथें बांधण्यांत येणार आहे असें समजतें. हें केंद्र पुढील मार्च अगर एप्रिल महिन्यांत सुरू होईल. दुसरें केंद्र जोधपूर येथें उभारण्यांत येणार आहे. पण अजमीर संस्थाननें भारतीय सरकारला अशी विनंति केली आहे कीं तें अजमीर येथें उभारावें. अजमीर जोधपूरपेक्षा अधिक सोईचें आहे, असें संस्थानचें मत आहे.

**जंगली जनावरांचें शिक्षण**—जंगली जनावरांना शिकवणाऱ्या माणसाला खरा धोका त्या प्राण्यांच्या हिंस्र वृत्तीपासून नसतो. हे प्राणी आपसांत मत्सर करतात आणि शिकविणाऱ्याचाहि मत्सर करतात, हा खरा धोका आहे. एम्. नवेंस्की ह्यांनीं वाघांचा व सिंहांचा अभ्यास करून हें मत बी. बी. सी. नभोवाणीवरून नुकतेंच व्यक्त केलें.

**राजकोटमध्यें सायकलीवर कर**—राजकोटच्या म्युनिसिपालिटीचा कारभार सध्यां ॲडमिनिस्ट्रेटरकडे सोंपविण्यांत आला आहे. नवीन कारभाऱ्यांनीं शहरांतील सायकलींवर वार्षिक १ रुपया कर घेण्याचें ठरविलें आहे. ह्या बाबीपासून १०,००० रुपये उत्पन्न होईल असा अंदाज करण्यांत आला आहे.

## रिझर्व्ह बँकेची दुहेरी भूमिका

सहकारी चळवळीच्या विकासाच्या व पुनर्घटनेच्या योजनांस लायक व पुरेशा अधिकारी आणि नोकरवर्गाची आवश्यकता आहे, हें स्पष्ट आहे. ह्या संबंधांतील सोई अपुऱ्या आहेत. म्हणून रिझर्व्ह बँकेनें सहकारी पगारदार सेवकांसाठी अखिल भारतीय ट्रेनिंग केंद्राची स्थापना करून त्यास आर्थिक मदत देण्यास प्रारंभ केला आहे. मुंबई प्रां. सहकारी इन्स्टिट्यूटच्या सहकार्यानें पुणें येथील सहकारी ट्रेनिंग कॉलेजांत ही व्यवस्था करण्यांत आली आहे. वरिष्ठ दर्जाच्या अधिकाऱ्यांसाठी सहा महिन्यांचा व जरा त्या खालील अधिकाऱ्यांसाठी एक वर्षाचा अभ्यासक्रम आखलेला आहे. ह्या योजनेस एप्रिल, १९५२ मध्यें प्रारंभ झाला, तेव्हांपासून सहामाही दोन वर्ग व वार्षिक एक वर्ग पुरे झाले असून सहामाही तिसरा वर्ग ६ मे, १९५२ रोजीं सुरू झाला आहे. अशा तऱ्हेचीं केंद्रें वेगवेगळया ठिकाणीं स्थापन करण्या करितां पंचवार्षिक योजनेनें १० लक्ष रुपयांची तरतूद केलेली आहे.

रिझर्व्ह बँक आणि वेगवेगळया राज्यांतील सहकारी चळवळ ह्यांचा संबंध जोडला जावा, ह्यासाठी "स्टँडिंग अडव्हायसरी कमिटी ऑन ॲग्रिकल्चरल क्रेडिट"ची स्थापना करण्यांत आली आहे. रिझर्व्ह बँकेच्या शेतीविषयक कर्जपुरवठ्याचें खातें व तत्संबंधीं प्रश्न ह्याबाबत बँकेला सल्ला देणें, हें त्या कमिटीचें काम आहे. ज्या सहकारी बँकांना रिझर्व्ह बँकेनें कर्ज दिलें आहे किंवा ती देणार आहे, अशांची त्यांच्या इच्छेनुरूप तपासणी करण्यांत रिझर्व्ह बँकेनें प्रारंभ केला आहे. ह्या तपासणीमुळें निरनिराळया राज्यांतील सहकारी बँकांना योग्य असें मार्गदर्शन उपलब्ध होऊं शकेल. सहकारी खातें बँकेची तपासणी करते, त्या स्वरूपाची ही तपासणी नसते; मध्यवर्ती बँक ह्यादृष्टीनें तिचें काम अधिक उपयुक्त कसें होईल ह्या दृष्टीनें रिझर्व्ह बँक सल्ला देत असते.

वरील विवेचनावर, सहकारी भांडवलपुरवठ्याचा प्रश्न कसा बिकट आहे हें लक्षांत येईल. अगोदर प्राथमिक चौकशीच मोठ्या प्रमाणावर करावयास हवी. कित्येक ठिकाणीं सहकारी बँकिंगच्या व कर्जपुरवठ्याच्या संघटनेच्या स्थापनेसच प्रारंभ करावा लागेल; कांहीं ठिकाणीं पुनर्रचना जरूर होईल. सहकारी खातें व सहकारी संस्था ह्यांच्या सेवकांची संख्या भरपूर व त्यांची लायकी योग्य दर्जाची असावी लागेल. मनुष्यबळ, कारभार व पैशाचें बळ ह्या तीन्ही प्रकारच्या अडचणींचें निराकरण करावें लागेल. पंचवार्षिक योजनेंत सहकारी चळवळीस महत्त्वाचें स्थान दिलेलें आहे, त्यामुळें सहकारी प्रगति तातडीनें होणें अत्यावश्यक झालें आहे. पंचवार्षिक योजनेनें वेगवेगळया मुदतीच्या कर्जविषयक तरतुदींचीं उद्दिष्टें घालून दिलीं आहेत, तीं साध्य करण्याचे कामीं रिझर्व्ह बँकेवर महत्त्वाची जबाबदारी येऊन पडलेली आहे. रिझर्व्ह बँकेची भूमिका सल्लागाराची व धनकोची आहे; सल्लागार ह्या नात्यानें ती नव्या योजना सुचविते आणि धनको ह्या नात्यानें त्या पार पाडण्यास प्रत्यक्ष आर्थिक मदत करते.

---

### कसोटी सामन्याचें उत्पन्न

इंग्लंड व ऑस्ट्रेलिआ ह्यांच्या दरम्यान झालेल्या दुसऱ्या कसोटी सामन्यांत ५०,००० पौंड उत्पन्न झालें. १९४८ सालीं लॉर्ड्स मैदानावर झालेल्या दुसऱ्या कसोटी सामन्यांत ४३,००० पौंड उत्पन्न झालें होतें.


स्थापना १९३६

**युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा**

[ शेड्यूल्ड बँक ]

पॅलेस स्ट्रीट, सातारा.

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक व बार्शी.

ता. ३१-१२-५२ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,४९,९२५ |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | १,७९,००० |
| ठेवी | रु. | ६७,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ७८,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|---|
| रु. २-८-० | रु. २-११-० | रु. ३-०-० | रु. ३-८-० |

वहा अगर अधिक वर्षें रु. ४-०-० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | २-०-० |
| चालू डिपॉझिट | " | ०-८-० |

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.

शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन



दि

**युनायटेड कमर्शिअल बँक लि.**

कलकत्ता.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | ८ कोटी रु. |
| खपलेलें भांडवल | ... | ४ कोटी रु. |
| वसूल भांडवल | ... | २ कोटी रु. |
| रिझर्व्ह फंड | ... | ७५ लक्ष रु. |

: बोर्ड ऑफ डायरेक्टर्स :

जी. डी. बिर्ला (चेअरमन)

| | |
|---|---|
| ईश्वरीप्रसाद गोएंका व्हाइस चेअरमन | रमणलाल जी. सरय्या व्हाइस चेअरमन |
| अनंत चरण लॉ | महादेव एल. डहाणूकर |
| बैजनाथ जालन | मदनमोहन आर. रुइया |
| गोविंदलाल बंगूर | मोहनलाल एल. शहा |
| पी. डी. हिमतसिंगका | मोतीलाल तापुरिया |
| रामेश्वरलाल नोपानी | नवीनचंद्र मफतलाल |

: जनरल मॅनेजर :

बी. टी. ठाकूर

भारत, बर्मा, पाकिस्तान आणि मलाया येथील महत्त्वाच्या शहरीं व गांवीं बँकेच्या शाखा असल्यानें आणि बँकेच्या संबंध जगभर एजन्सीच्या व्यवस्था असल्यानें भारतांत व भारताबाहेर अत्युत्कृष्ट बँकिंगची सेवा करण्यास बँक सुसज्ज आहे.

# अर्थ

बुधवार, ता. १५ जुलै, १९५३





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद् वामन काळे


## सिंद्री कारखान्याच्या विस्ताराच्या शिफारसी

भारत आणि अमेरिका ह्यांच्या दरम्यान तांत्रिक सहकार्य करण्याविषयीं करार झालेला आहे. ह्या करारांतील अटींप्रमाणें सिंद्री येथील खताच्या कारखान्याचा विस्तार कशा पद्धतीनें करावा ह्याविषयीं शिफारस करण्याकरता तज्ज्ञांचें एक मंडळ कारखाना पहाण्यासाठीं धाडण्यांत आलें होतें. मंडळाचें नेतृत्व कारखान्याचे माजी मॅनेजिंग डायरेक्टर श्री. बी. सी. मुखर्जी ह्यांच्याकडे होतें. तज्ज्ञ मंडळानें आपला अहवाल आता भारत सरकारला सादर केला असून त्यांत करण्यांत आलेल्या शिफारसींचा विचार सध्या करण्यांत येत आहे, असें समजतें.

तज्ज्ञ मंडळाचें असें मत असल्याचें समजतें कीं, हा कारखाना सरकारी मालकीच्या उद्योगधंद्यांपैकीं एक महत्त्वाचा असल्यानें त्यांत तयार होणाऱ्या खताला बाजारपेठ मिळविण्याचें काम स्वतः कंपनीनेंच करावें. सध्या भारत सरकारचें अन्न व शेतकी खातें आयात केलेल्या अगर देशांत उत्पन्न झालेल्या खताच्या विक्रीची व्यवस्था करतें. अन्न व शेतकी खात्यानें खताचा एक साठा केलेला असून त्याचा उपयोग करून किंमतविर नियंत्रण ठेवण्यांत येतें. १९५२ सालीं भारत सरकारनें सल्फेट ऑफ अमोनिआची जी आयात केली, तीमधील प्रत्येक टनामागें सरकारला ३७० ते ४०० रुपयेपर्यंत किंमत यावी लागली. ३१ डिसेंबर, १९५२ अखेर दर टनाला ३५० रुपये दरानें खताची विक्री करण्यांत येत होती. परंतु त्यानंतर दर टनाला २८५ रुपये असा भाव ठरवून टाकण्यांत आला. अन्न आणि शेतकी खात्यातर्फें ह्या खताची विक्री राज्य सरकारांना करण्यांत येते आणि नंतर राज्य-सरकारें खत शेतकऱ्यांना विकतात. पण खत प्रत्यक्ष शेतकऱ्यापर्यंत पोचेपर्यंत मध्यें पुष्कळच दलालीचे व्यवहार होतात. त्यामुळें शेतकऱ्याला खत महाग पडतें. सिंद्रीच्या कारखान्यानें स्वतःच खताची विक्री करावी म्हणून जी सूचना करण्यांत आली आहे, तिचा उद्देश मधले दलाल काढून टाकण्याचा असावा असें दिसतें. गेल्या वर्षीच्या अहवालांत डायरेक्टरांनीं असें सूचित केलें आहे कीं, मध्यवर्ती सरकारकडील स्वतःच्या सांठ्याची योजना रद्द करून कारखाना स्वतःच त्याचें वाटप आपणाकडे घेण्याचा विचार करीत आहे. कंपनी स्वतः बाजारपेठेच्या संघटनेचें कार्य करीत असल्याच्या वार्ता आतां हातीं आल्या आहेत. कंपनीची खत विकण्याची संघटना अस्तित्वांत आल्यावर पुढील वर्षाच्या प्रारंभापासून हें कार्य ती करूं लागेल असा अंदाज आहे.

भारतामधील साधनसामुग्रीचा उपयोग करून विविध प्रकारचीं खतें पुरविण्यासाठींहि एक सूचना अहवालांत करण्यांत आली आहे. सिंद्री येथील कारखान्यांत सध्या सल्फेट ऑफ अमोनिआ तयार होतें. ह्या खताबरोबरच अमोनिअम नैट्रेट तयार करण्याची यंत्रसामुग्रीहि बसविण्यांत यावी अशी ही शिफारस आहे. असें केल्यानें एकाच प्रकारचें खत उत्पादन करण्याची जरूरी न रहातां कारखान्याच्या उत्पादनांत विविधता येईल आणि त्यांत समतोलता राहील असें सांगण्यांत आलें आहे. कारखान्यांत सध्या जें खत तयार होत आहे त्याचा उपयोग अज्ञानामुळें फारच कमी प्रमाणांत करण्यांत येत आहे, ह्या गोष्टीकडेहि लक्ष वेधण्यांत आलें आहे. म्हणून ह्या खतांची लोकप्रियता वाढविण्यासाठीं सरकारनें मुद्दाम जोराचे प्रयत्न करावे असेंहि सुचविण्यांत आलें आहे. देशांतील सध्याची गरज भागविण्यासाठीं जरूर तर खतांची आयातहि करण्यांत यावी अशी सूचना करून, मंडळानें असें मत व्यक्त केलें आहे कीं बाजारपेठांची योग्य संघटना झाल्यास नव्या प्रकारचीं खतें उत्पन्न करणें नफ्याचें होईल.

---

## रशिआ व चीन ह्यांचें व्यापारी सहकार्य

लाल चीनच्या १९५२ सालांतील परदेशी व्यापारापैकीं ५१ टक्के व्यापार सोव्हिएट रशिआशी झाला. त्या सालच्या मार्च महिन्यांत उभयता देशांनीं परस्परांत एक व्यापारी करार केला होता. चीननें त्या वेळीं आपला पंचवार्षिक कार्यक्रम आखला होता. अमेरिकेकडून अगर प. युरोपीय राष्ट्रांकडून मदत मिळण्याची फारशी आशा नसल्यानें चीननें रशिआशीं करार केला असावा, असें म्हणतात. १९५० सालीं रशिआनें चीनला ३० कोटी डॉलर्स म्हणजे सुमारे १०,७१,४०,००० पौंड कर्ज दिलें होतें. त्यावर व्याज अवघे १ टक्का घेण्यांत येत होतें. त्याशिवाय औद्योगिक यंत्रसामुग्री आणि रेल्वेचें सामान ह्यांच्या रूपानें ६० कोटी डॉलर्सची म्हणजे २१,४२,८०,००० पौंडांची मदत करण्यांत आली. पण केवळ व्यापारी करार करून आणि सामुग्रीची मदत देऊनच रशिआ थांबला नाहीं. रशिआनें आपले औद्योगिक तज्ज्ञ आणि तंत्र ह्यांचाहि चीनला फायदा घेऊं दिला. त्यामुळें चीनच्या औद्योगीकरणाला फार महत्त्वाची मदत झाली. चीनच्या औद्योगिक पुनर्घटनेसाठीं मुख्यतः यांत्रिक स्वयंचलित हत्यारांची आवश्यकता होती व तीच गरज रशिआनें भागविली. त्याशिवाय पेट्रोल, साखर व दैनंदिन जीवनांत लागणाऱ्या वस्तू ह्यांचाहि पुरवठा रशिआनें केला. पदार्थांच्या किंमतीची पातळी ठरविण्यांत अशा वस्तूंचें फार महत्त्व असतें. त्यांच्या पुरवठ्यामुळेंच १९५० ते १९५१ सालीं किंमती योग्य पातळीवर राखणें चीनला शक्य झालें. व्यापारी करारामुळें चीनच्या शेतीच्या मालाला व लहान-सहान उद्योगधंद्यांत तयार होणाऱ्या मालाला रशिआची विस्तीर्ण बाजारपेठहि लाभली. जागतिक बाजारपेठेंत यांत्रिक साहित्य व औद्योगिक कच्चा माल ह्यांच्या ज्या किंमती होत्या त्यांच्यापेक्षा २० ते ३० टक्के कमी किंमत देऊन चीनला वरील माल मिळाला.

---

**नमुनेदार डेअरी फार्म**—बंगळोर येथें माधवनगर हाय ग्राऊंडस ह्या ठिकाणीं एक नमुनेदार डेअरी फार्म उघडण्यांत आलें आहे. दूध निर्जंतुक करण्यासाठीं लागणारी अगदीं नवीन यंत्रसामुग्री फार्ममध्यें बसविण्यांत आली असून दूध हवा-बंद बाटल्यांतून भरे-पर्यंत कोठल्याहि अवस्थेंत त्याला हाताचा स्पर्श होत नाहीं. सध्या २,००० पौंड दूध रोज पुरविण्यांत येणार आहे. पण १०,००० पौंड दुधाच्या बाटल्या भरण्याची सोय डेअरींत आहे.

## जपान व रशिआ ह्यांच्यातील व्यापार

फारसा गाजावाजा न करतां जपान व रशिआ ह्यांनीं परस्परांत व्यापार करण्यास प्रारंभ केला आहे. पण ह्या व्यापाराचें स्वरूप मात्र मामुली नाहीं. सोव्हिएट रशिआचीं जहाजें जरूर पडल्यास जपानी बंदरांत येतात व आपली दुरुस्ती करून घेतात. ह्या सवलतीसाठीं सॅखॅलिन बेटांतील कोळसा जपानला पुरविण्यांत येतो. एका जपानी कंपनीनें अशा स्वरूपाचा करारच केलेला आहे. कराराप्रमाणें १,००० टन वजनाची एक सोव्हिएट बोट नुकतीच कोबे ह्या जपानच्या बंदरांत आली होती. बोटीची दुरुस्ती करण्यांत आल्यावर मोबदला म्हणून १५० टन कोळसा देण्यांत आला. ह्या कंपनीनें अशा दुरुस्त्यांचा मोबदला म्हणून रशिआकडून २,५०,००० टन कोळसा घेण्याचा करार केला आहे. रशिआला जपान मच्छीमारीच्या बोटी आणि तांब्याची तारहि पुरवितो. 'ॲडमिरल सेमिआबिन' ह्या नांवाची दुसरीहि एक रशिअन बोट वरील कराराप्रमाणें कोसाका बंदरांत आली आहे. ह्या बोटीचें वजन ४,१२५ टन आहे, आणि तिनें ५ हजार टन कोळसा जपानला देण्यासाठीं आणला आहे. जपानच्या व्यापारविषयक अधिकाऱ्यांना असें वाटत आहे कीं, हा व्यवहार फक्त कोळशापुरताच मर्यादित रहाणार नाहीं. लवकरच सॅखॅलिन बेटांमधील अगर बाकूमधील तेलहि जपानला रशिअन बोटींच्या दुरुस्त्यांच्या मोबदल्यांत मिळूं शकेल असा त्यांचा अंदाज आहे. त्याशिवाय कोळसा मिळविण्यासाठीं जपान रशिआला मच्छीमारीची जाळी आणि मोटार-बोटी पुरवितो. जपानमध्यें औद्योगिक जळणाचा पुरेसा पुरवठा नसल्यानें मिळेल तेथून तें मिळविणें त्याला भागच असतें.

## बँक ऑफ कलकत्याच्या हिशेबांतील ९१ लक्ष रुपये

लिक्विडेशनमध्यें असलेल्या दि बँक ऑफ कलकत्ता लि. चे दोघे डायरेक्टर्स व कॅशर ह्यांनीं बँकेची ९१ लक्ष रु. ची जिंदगी परत मिळवून द्यावी किंवा तेवढी रक्कम भरावी, असा कलकत्ता हायकोर्टचे न्यायाधीश न्यायमूर्ति दासगुप्ता ह्यांनीं हुकूम केला. कंपनी कायद्याच्या २३५ व्या कलमाखालीं ऑफिशिअल लिक्विडेटरनें केलेल्या अर्जावरून हा हुकूम करण्यांत आला. मॅनेजिंग डायरेक्टर मुरारीमोहन चतर्जी ह्यांनीं ४५,९८,६७७ रु. भरावयाचे आहेत, डायरेक्टर मदन गोपाळ चक्रवर्ती ह्यांनीं १७,९८,६७७ रु. भरावयाचे आहेत आणि कॅशियर सेनगुप्ता ह्यांच्या वांट्यास २८ लक्ष रु. आले आहेत. बँकेचीं कांहीं येणीं पुरी चौकशी न करतां, विनाकारण लिहून टाकण्यांत आलीं आणि सरकारी रोखे आणि सोनें ह्यांच्या विक्रीचे आलेले २९ लक्ष रु. शाखांकडे पाठविण्यांत आले असें दाखवून फक्त १ लक्ष रु. च धाडण्यांत आले, असें लिक्विडेटरनें दाखवून दिलें. बँकेचें दुसऱ्या एका बँकेशीं विलीनीकरण करण्यासाठीं नेमलेल्या ऑडिटरच्या सल्ल्यानुरूपच कर्जें लिहून टाकण्यांत आलीं व ती गोष्ट डायरेक्टरबोर्डानें व भागीदारांच्या वार्षिक सभेनें मंजूर केली, असा बचाव करण्यांत आला. न्यायमूर्तींनीं प्रतिवादींचें म्हणणें अमान्य केलें. प्रतिवादींनीं म्हटल्याप्रमाणें वार्षिक सभा भरलीच नाहीं आणि २८ लक्ष रु. चा हिशेब लागलाच नाहीं; ती रक्कम बँकेच्या शाखांकडे धाडलीच नाहीं, असें हायकोर्टास आढळून आलें.

## सोलापूर डि. सें. को. बँकेची सिद्धार्थ शाखा

दि सोलापूर डि. सें. को. बँकेच्या सिद्धार्थ शाखेचा उद्घाटन समारंभ दि. १० जून रोजीं जिल्हाधिकारी श्री. आर. एफ. बोगा, आय. ए. एस., ह्यांच्या हस्तें झाला. ही शाखा बँकेच्याच स्वतःच्या इमारतींत काम करणार आहे. प्राथमिक सहकारी पतपेढ्यांच्या सभासदांना त्यांच्या ठेवींवर ज्यास्त दरानें व्याज देण्यांत येणार आहे. उद्घाटनाचे दिवशीं अशा कित्येक सभासदांनीं शाखेंत सेव्हिंग्ज खातीं उघडण्याचें मान्य केलें. जिल्हाधिकाऱ्यांनीं उद्घाटनाचे आपल्या भाषणांत बँकेच्या प्रगतीचा आढावा घेऊन तिच्या नव्या शाखेस सुयश चिंतिलें.

यंदांचा उन्हाळा सोलापूरच्या नागरिकांस बराच जाणवला. सोलापूर शहरांतील मध्यमवर्गीय समाज, वकील, डॉक्टर्स वगैरे व्यावसायिक; त्याचप्रमाणें सरकारी आणि खासगी ऑफिसेसमधील अधिकारी आणि नोकरवर्ग, गिरण्यामधील अधिकारीवर्ग व गिरणीकामगारांच्या सोसायट्यांचे चालक व सभासद आणि शिक्षणसंस्था ह्यांची सोय व्हावी म्हणून सदर शाखा बँकेनें स्थापन केली आहे. या नवीन शाखेच्या कामाची वेळ शनिवार खेरीज रोज सकाळीं ८॥ ते ११॥ व सायंकाळीं ४ ते ६ अशी राहील व शनिवारीं फक्त सकाळीं ८॥ ते ११॥ अशी राहील. ह्या शाखेमार्फत सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारणेचा म्हणजे (चालू ठेव, सेव्हिंग्ज ठेव, होम सेव्हिंग्ज, मुदत ठेव, व ग्रामीण बचत ठेवी वगैरेंचा) व चेक्स, हुंड्या विक्री व वसुलीचा व्यवहार केला जाईल. बँकेचें वसूल भांडवल ६,३६,९१० रु. असून तिचे रिझर्व्ह व इतर फंड ४,९५,००० रु. चे आहेत. सोलापूर जिल्ह्यांत बँकेच्या आठ शाखा जनतेची सेवा करीत आहेत.

## उत्तर प्रदेश सरकारचा मजूर-विषयक कार्यक्रम

उत्तर प्रदेश सरकारनें मजूर-विषयक पंचवार्षिक कार्यक्रम आंखला आहे. ह्या कार्यक्रमासंबंधींचा मे १९५३ महिन्याचा अहवाल प्रसिद्ध झाला आहे. त्यावरून पुढीलप्रमाणें माहिती मिळते. शुगर फॅक्टरीज हौसिंग स्कीमप्रमाणें ३१ साखरेच्या कंपन्या आपल्या कामगारांसाठीं ६२१ घरें बांधीत होत्या. ही योजना अंमलांत आणण्यासाठीं निरनिराळ्या साखर कारखान्यांना मिळून ७,५०,२९३ रुपये सरकारकडून देण्यांत आले आहेत. इंडिअन ट्रेड युनिअन्स ॲक्ट, १९२६ प्रमाणें २६ ट्रेड युनिअन्सची मान्यता काढून घेण्यांत आली आणि नवीन १४ ट्रेड युनिअन्सची नोंद करण्यांत आली. आतां नोंद झालेल्या ट्रेड युनिअन्सची संख्या १७४ झाली आहे. १९४८ च्या फॅक्टरी ॲक्टमधील कलमांचा भंग केल्याबद्दल चीफ इन्स्पेक्टर ऑफ फॅक्टरीज ह्यांच्याकडे ६४ तक्रारी करण्यांत आल्या. ४५ कारखान्यांविरुद्ध कायद्यांतील वेगवेगळ्या कलमांचा भंग केल्याबद्दल एकूण ८३ खटले भरण्यांत आले. कारखान्यांत झालेल्या अपघातांची संख्या ६७४ झाली. त्यांपैकी ३ अपघात प्राणघातक ठरले व ६७१ अपघातांत कामगारांना फक्त दुखापती झाल्या. कामगार-मालक संबंधांत तडजोड घडवून आणणाऱ्या बोर्डांनें तंट्यांची ४६० प्रकरणें हाताळलीं. १०५ तंटे ॲडज्युडिकेशन बोर्डाकडे आले आणि अलाहाबाद येथील स्टेट इंडस्ट्रिअल ट्रायब्यूनलनें १४ प्रकरणें ऐकून घेतलीं. उत्तर-प्रदेश सरकारनें औद्योगिक कामगारांच्या बाबतींत स्वतंत्र कार्यक्रम आखून त्याच्या अंमलबजावणीची माहिती देण्याचा जो उपक्रम चालू केला आहे तो स्वागतार्ह वाटतो.

## अजून नऊ महिने वेळ आहे

( लेखक :—श्री. ग. कृ. चितळे, पुणें–पार्ले. )

सुप्रसिद्ध "मौज" या साप्ताहिकाचे ता. २४ मे १९५३ चे अंकांत, "कोकणचें कुबेराचें धन" यावर एक विचारास चालना देणारा लेख आला आहे. ७–८ स्तंभांत या धनाबाबत सर्व बाजूंनीं विचार केला आहे.

कोकणांतील "रत्नागिरी हापूस" हें एक निसर्गानें दिलेलें धन आहे. प्रस्तुत लेखांत बागवाले, बागा घेणारे, माल बाहेरगांवीं विकणारे या सर्वांचे दोष व अडचणी दाखविल्या आहेत. त्याचप्रमाणें काय करावें याबाबत त्रोटक सूचना आहेत.

कोकणचे हापूसचा मोसम मार्च ते मे–जून पर्यंत असतो. त्यावेळीं धाडसी व कर्तृत्ववान तरुणांना, नेकीनें केल्यास, एक व्यापार करतां येण्याजोगा आहे. सध्यां ठिकठिकाणीं घरगुती पेटचा–पेटारे आणून पुष्कळ लोक एकएकटे लहान प्रमाणावर व्यापार करतात. अशा लहान व्यापाऱ्यांनीं एकत्र येऊन, एकादी योजना आखून प्रयत्न केल्यास, ती यशस्वी होऊन, "सुफल"-दाई होईल. प्रत्यक्ष ती अंमलांत आणण्यास अजून नऊ महिने अवकाश आहे. तेव्हां एव्हांपासून त्या दृष्टीनें प्रयत्न सुरू होणें जरूर आहे.

ज्यांना या व्यापाराचा थोडाबहुत अनुभव आहे, अशांनीं एकत्र येऊन योजना आखावी व "को–आपरेटिव्ह," तत्त्वावर ती पार पाडावी; त्या योजनेचे कांहीं टप्पे येणेंप्रमाणें असतील.

१. रत्नागिरी जिल्ह्यांतील आंबेबागवाले यांची यादी तयार करणें. २ आंब्याला मोहर आल्यापासून रिपोर्ट घेणें व "मोसमाचा" विचार करणें. ३ आंब्याला पाड लागल्यापासून, ते गोळा करण्याची, त्यांची प्रतवारी लावण्याची, फळाला धक्का लागणार नाहीं व फळांची अफरातफर होणार नाहीं, व प्रवासांत नासधूस होणार नाहीं, यांची व्यवस्था करणें. ४ फळ इच्छित स्थळीं गेल्यावर त्याची वांटणी. ५ गिऱ्हाइकांची यादी बनवून त्यांचेकडे माल पोंचविणें. ६ या सर्व कारभारास लागणारें भांडवल उभारणें.

मला वाटतें सुरुवातीला, लहान लहान सोसायट्यांकरवीं हा धंदा दोन वर्षे हाताळला जावा व त्यानंतर मग पुढें, दोन वर्षांचा अनुभव जमेला धरून, एक मोठ्या सोसायटीनें हा धंदा हातीं घ्यावा. मार्च ते मे साधीं कामें करण्यास, प्रवास वगैरे कामास, एस. एस. सी. चे परीक्षेस बसलेले पुष्कळ गरीब व गरजू विद्यार्थी उपयोगी पडतील. त्यांना थोडें काम मिळेल.

सध्याचे या धंद्यांतील दोष टाळून, व या प्रयत्नांत येणाऱ्या अडचणींना तोंड देऊन कांहीं सोसायट्यांनीं हा व्यापार करावा व सर्वांचा फायदा करून घ्यावा व पुढें मोठ्या प्रमाणावर हा धंदा चालविण्यासाठीं सध्या पाया घालावा, ह्यासाठीं हा विषय आपले वाचकांपुढें ठेवीत आहें.

---

## बेलापूर साखर कारखाना व जमीनमालक वाद

"एकरी ५० रु. खंड व ३० वर्षे मुदत" असा निर्णय

बेलापूर शुगर मिल, हरेगांव या साखर कारखान्याकडे खंडानें असलेल्या जमिनींची मुदत ता. ३० मार्चला संपली. नवीन खंडरोखे करून देतांना खंड वाढवून मिळावा अशी शेतकऱ्यांतर्फे मागणी करण्यांत आली. या प्रश्नावर चौकशी करण्यासाठी सरकारनें नगर जिल्ह्याचे कलेक्टर श्री. राणा यांना लवाद नेमलें. त्यांनीं आपला निर्णय ता. २९ रोजीं श्रीरामपूरला जाऊन दिला. कंपनीनें नवीन भाडेपट्टे ३० वर्षे मुदतीनें, एकरी ५० रुपये खंडानें करावेत असा हा निर्णय आहे.

## अन्योन्य सहायकारी मंडळी लि.

### जयरत्न इमारतीचा उद्घाटन समारंभ

( लेखक : श्री. द. ल. महाबळेश्वरकर, बडोदें )

अखिल भारतांत सहकारी क्षेत्रांत अग्रपूजेचा मान ज्या संस्थेस पात्र झाला आहे, अशी बडोद्यांतील महाराष्ट्रीयांनीं स्थापन केलेली सहकारी संस्था म्हणजे "अन्योन्य सहायकारी मंडळी लिमिटेड" ही होय. या संस्थेची मुहूर्तमेढ सन १८८९ सालीं वसंतपंचमीच्या दिवशीं कै. श्री. विठ्ठल लक्ष्मण कवठेकर यांच्या शुभ हस्तें रोंवली गेली. हेच या मंडळीचे आद्य संस्थापक होत. पुढें तिला उर्जित अवस्थेस आणून नांवालौकिकास आणण्याचें श्रेय कै. नथु हरी शेंव या कर्तृत्ववान व कार्यकुशल अशा इसमाकडे जातें. या संस्थेनें मध्यमवर्गीय लोकांची जी सेवा बजाविली आहे ती अतुलनीय असून प्रशंसेस पात्र आहे. या संस्थेनें रौप्य, सुवर्ण व हीरक महोत्सव असे भाग्याचे टप्पे गांठून, हीरक महोत्सवाचें कायम प्रतीक म्हणून "जयरत्न" नांवाची आपल्या भागदार मंडळीस स्वस्त भाड्यानें राहण्याची सोय करण्याच्या हेतूनें भव्य व सुंदर अशी इमारत नुकतीच बांधलेली आहे. या इमारतीचा उद्घाटन समारंभ तारीख १२–६–१९५३ रोजीं मोठ्या थाटानें झाला.

या इमारतीची पूर्वतयारी श्री. चिंतामण गोविंद जोशी, एम्. ए., एलएल्. बी., बी. कॉम., यांच्या हस्तें होऊन तिला लोकांच्या नजरेस आणण्याचे महत्त्वाचें कार्य मंडळीचे विद्यमान अध्यक्ष श्री. सखाराम अमृत सुधाळकर, बडोदें राज्याचे माजी दिवाण व उपाध्यक्ष श्री. गंगाधर माधव तांबे यांनीं केलें आहे. हीं नररत्नें मंडळीस लाभल्यामुळें मंडळीचा कीर्तिपरिमल सर्वत्र पसरलेला आहे. या इमारतीच्या उद्घाटन समारंभाचें अध्यक्षस्थान मुंबई राज्याचे सहकारी अधिकारी, श्री. पां. ज. चिन्मुलगुंद, आय. सी. एस. यांनीं मंडीत केलें होतें. अध्यक्ष या नात्यानें त्यांनीं जें विचारपरिप्लुत असें भाषण केलें त्याचा सारांश खालीलप्रमाणें:—

"अन्योन्य सहायकारी मंडळी इतकी जुनी संस्था अखिल हिंदुस्थानांत दुसरी कोणतीहि नाहीं. मुंबई राज्यांत आजमितीस एकंदर १७ सहकारी संस्था आहेत. या संस्थेंत एकंदर ९३ कोटी भांडवल गुंतलेलें आहे. दरवर्षी १२ कोटी रु. लोकांस व्याजीं देण्यांत येऊन ते सर्व बिन तक्रार वसूल होत असतात यावरून सहकारी कार्याची प्रगति दिसून येते. कोणत्याहि व्यापारी तत्त्वावर चालणाऱ्या इतर संस्थेंत अशा प्रकारच्या कर्जाचा वसूल बिन–तक्रार होऊं शकत नाहीं. ही ९३ कोटींची रकम धनिकांची नसून मध्यम वर्गांतील लोकांनींच गुंतविलेली आहे. याच रीतीनें जर प्रगति होत राहिली तर जीवनकार्यक्रम चालविण्यास पैशाची अडचण भासणार नाहीं. यासाठी प्रवृत्तिपरत्वें निष्ठा ठेवून खऱ्या निःस्वार्थानें सेवा करणाऱ्या कार्यकर्त्यांची अत्यंत आवश्यकता आहे. या मंडळीनें मध्यमवर्गांतील लोकांस स्वस्त भाड्यानें घरें मिळण्याचा प्रश्न हातीं घेतला आहेच, त्याचप्रमाणें मध्यमवर्गांतील लोकांच्या बालकांच्या शिक्षणासाठी आर्थिक मदत करण्याची योजना करण्याचा प्रश्न विचार करण्यासारखा आहे."

---

**लंडनमध्यें गिर्यारोहणाचें शिक्षण**—मि. हिलेरी आणि श्री. तेनसिंग ह्यांनीं मौंट एव्हरेस्ट शिखरावर चढण्यांत यश मिळविल्यामुळें लंडनमध्यें गिर्यारोहण करण्याविषयीं औत्सुक्य वाढलें आहे. अशा हौशी लोकांना शिक्षण देण्यासाठीं लंडन कौंटी कौन्सिलनें एक खास वर्ग काढला आहे. प्रत्यक्ष अनुभव असलेल्या शिक्षकांकडून तो चालविण्यांत येणार आहे.

## हिंद व ब्रह्मदेश यांचेमधील व्यापारी करार

हिंद व ब्रह्मदेश यांच्यामध्यें श्री. मुनशी यांनीं वाटाघाटी करून १९५१ मध्यें कांहींसा देवाण-घेवाण स्वरूपाचा व्यापारी करार केला होता, तो पांच वर्षे मुदतीचा आहे. ब्रह्मी व्यापारी शिष्टमंडळाशीं नुकत्याच दिल्ली येथें वाटाघाटी होऊन हिंदनें ब्रह्मदेशाला पाठवावयाच्या मालाची यादी आतां बरीच विस्तृत करण्यांत आली आहे. १९४९ ते १९५१ हीं दोन वर्षेच फक्त हिंदचा ब्रह्मदेशाशीं चालणारा व्यापार अनुकूल तफावत दाखविणारा झाला. १९४९-५० मध्यें हिंदला ब्रह्मदेशाशीं झालेल्या व्यापारांत १ कोटी, ८० लक्ष रु. अनुकूल तफावत उरली व १९५०-५१ मध्यें अनुकूल तफावत ३ कोटी ५६ लक्ष रु. उरली होती. परंतु इतर वेळीं नेहमीं हिंदचा ब्रह्मदेशाशीं व्यापार प्रतिकूल तफावतच दाखवितो. दुसऱ्या महायुद्धाच्या पूर्वीच्या तीन वर्षांत दर वर्षी सुमारें १४ कोटी रु. प्रतिकूल तफावत येत होती. १९४८-४९ सालीं हिंदला ब्रह्मदेशाशीं व्यापारांत २५कोटी रु. प्रतिकूल तफावत आली होती. तांदुळाची मोठ्या प्रमाणांत हिंदमध्यें आयात हें तुटीच्या व्यापाराचें मुख्य कारण होतें. हिंद-ब्रह्मदेश व्यापार हल्लींचा करार होण्यापूर्वी वर्षाला सुमारें ३० कोटी रु. होत होता. हल्लींचा करार झाल्यावर १९५१-५२ मध्यें सुमारें ४३ कोटी रु. व १९५२-५३ मध्यें ४८ कोटी, ४६ लक्ष रु. इतका एकूण व्यापार झाला. १९५१-५२ मध्यें हिंदला ३ कोटी, ७९ लक्ष रु. तूट आली व १९५२-५३ मध्यें ४ कोटी, ४० लक्ष रु. तूट आली. आजच्या खरेदीदारांच्या बाजारपेठेंत ब्रह्मदेशाशीं झालेला व्यापारी करार एकंदर आपल्या निर्गतीच्या वाढीच्या दृष्टीनें योग्य आहे.

**खरगपूर जिल्ह्यांत खनिजांचा शोध**—खरगपूर जिल्ह्यांतील अरण्यव्याप्त भागांत लोखंडाची माती सांपडण्याचा संभव असल्यानें भूगर्भविषयक पहाणी पुनः सुरू झाली आहे. बऱ्याच वर्षांपूर्वी अशी पहाणी करतांना त्या भागांत उष्ण पाण्याचे झरे आढळले होते. त्यावरून ह्या भागांत गंधकहि सांपडेल असा अंदाज करण्यांत आला आहे.

**मागासलेल्या जातींना शैक्षणिक सवलती**—हैद्राबाद राज्य सरकारनें चालू वर्षापुरता असा निर्णय घेतला आहे कीं, वैद्यकीय आणि स्थापत्य कॉलेजमधून मागासलेल्या वर्गासाठी ८ टक्के आणि शेड्यूल्ड क्लासेससाठी ८ टक्के जागा राखून ठेवण्यांत याव्या. ह्या जागा देतांना मात्र लायकीकडे लक्ष देण्यांत येणार आहे, असें समजतें.

## नियोजन मंडळाची नवी पुस्तिका

नियोजन मंडळानें नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या 'बिल्डिंग न्यू इंडिया' या पुस्तिकेंत पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या पार्श्वभूमीवरून नवभारताच्या उभारणीचें दर्शन घडविण्यांत आलें आहे. औद्योगिक कारखान्यांसंबंधींच्या पहिल्या विभागांत सिंद्री कारखाना, डीडीटी कारखाना, यंत्रें, मशीन टूल्स, टेलिफोन, केबल्स व बिनतारी साहित्य यांचे कारखाने व पोलाद उत्पादन-वाढ यांच्या योजनेच्या प्रगतीची माहिती दिली आहे. वाहातूक आणि दळणवळण यासंबंधींच्या विभागांत रेल्वे विकासाचे कार्यक्रम, चित्तरंजन रेल्वे इंजिनांचा कारखाना, रेल्वे कोच फॅक्टरी, कांडला बंदर आणि नभोवाणी विकासाचा ३.५ कोटी रुपयांचा कार्यक्रम याबद्दल हकीगत दिली आहे. महत्त्वाच्या सर्व जलविद्युत् आणि पाटबंधाऱ्यांच्या योजनांची माहिती त्यासंबंधींच्या विभागांत दिली आहे.

छोटे पाटबंधारे, पडिक जमिनीची लागवड व मच्छिमारीची वाढ यासंबंधींच्या योजना शेतकी या विभागांत देण्यांत आल्या असून, निलोखेरी व फरिदाबाद योजनांच्या प्रगतीची माहिती सामूहिक विकासाच्या सदराखाली दिली आहे. समाजशास्त्रावरील शेवटच्या विभागांत मलेरिया नियंत्रण, वैद्यकीय व आरोग्यविषयक शिक्षण, घरबांधणी व तांत्रिक आणि मूलोद्योग शिक्षण यांबद्दल थोडक्यांत माहिती दिली आहे.

**उत्तर प्रदेशांतील सौंदर्य स्थळें**—उत्तर प्रदेशांतील सांस्कृतिक दृष्ट्या महत्त्वाच्या स्थानांचे आणि सौंदर्यस्थळांचे चित्रपट घेण्याचें काम राज्य-सरकारनें सुरू केलें आहे. बद्रीनाथाच्या देवळासंबंधीं अनुबोधपट तयार करण्यासाठी सिनेमा-तंत्रज्ञांची एक तुकडी नुकतीच तेथें जाऊन आली. उत्तर प्रदेशांतील ५२ जिल्ह्यांत भारतीय सरकारचे बोलपट दाखविण्यासाठी प्रोजेक्टर्स देण्यांत आले आहेत.

**पू. पाकिस्तानांत कापडाच्या गिरण्या**—पू. पाकिस्तानांत कापडाच्या आठ गिरण्या लवकरच उत्पादनास प्रारंभ करतील असें समजतें. सर्व गिरण्यांत मिळून २,००,००० चात्या आहेत. आठपैकी सहा गिरण्या खाजगी मालकीच्या रहाणार असून दोन सरकारनें स्वतःच काढलेल्या आहेत. गिरण्यांची जपानी यंत्र-सामुग्री आली असून ती उभारण्याचें काम जपानी यंत्रज्ञ करीत आहेत.

दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.
—पुणें शाखा—
१७१, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.
आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.
एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :
ब्रँच सेक्रेटरी.



## हातमागांसाठी कापडाचे प्रकार राखून ठेवण्यास विरोध

### " विणकरांची संख्या कमी करा, " फेडरेशनचें म्हणणें

फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजच्या कमिटीनें, भारत सरकारच्या टेक्स्टाइल इन्क्वायरी कमिटीकडे हातमागाच्या धंद्यास साहाय्य करण्याच्या प्रश्नावर मत पाठविलें आहे. कमिटीचें म्हणणें खालीलप्रमाणें आहेः—

" हातमागाच्या धंद्यास कोणत्याहि प्रकारानें मदत केली, तरी त्याबरोबरच हातमागावर अवलंबून असणारांची संख्या कमी करण्याच्या प्रश्नाकडे तितकेंच लक्ष दिलें पाहिजे. हातमागाचा धंदा सोडून देणारांना प्रोत्साहन दिलें पाहिजे. विणकरांच्या मुलांना दुसऱ्या धंद्याकडे आकर्षिलें पाहिजे. गेल्या दहा वर्षांत हातमागांची संख्या १० लाखांनीं वाढली आहे, परंतु हातमागावरील कापडाचें उत्पादन त्या प्रमाणांत वाढलेलें नाहीं. वाढत्या बेकारीचें हें निदर्शक आहे. अशा परिस्थितींत, हातमागाला उत्तेजन देणें म्हणजे बेकार होण्याचा संभव असलेल्यांची संख्या वाढविणेंच होय. हातमागाच्या धंद्याला मदत देण्यास कमिटीचा विरोध नाहीं; सध्यांच्या परिस्थितींत त्या धंद्याचें असलेलें सामाजिक व आर्थिक महत्त्व कमिटीस पटलें आहे. परंतु, गिरण्यांची वाढ झाली तरी दीर्घकाळ हातमाग टिकून राहिले म्हणून त्यांना ह्याहि पुढें टिकून रहाण्याइतपत शक्ति आहे, हें म्हणणें मात्र कमिटीला मान्य नाहीं. हातमागाला मदत दिल्यानें मूळ रोग बरा होणार नाहीं; फारतर त्यामुळें होणारें दुःख कांहीं काळ कमी होईल. हातमागाला मदत केल्यामुळें उत्पादनाच्या सुधारलेल्या पद्धतींस आडकाठी होतां कामा नये. गिरणीच्या कापडावर १९५० पासून कांहीं निर्बंध घातलेले आहेत, परंतु त्यापासून विणकरांचा अपेक्षित फायदा झालेला नाहीं. कारण, त्याच्या अडचणींचीं मुळें खोलपर्यंत पोंचलेलीं आहेत. सध्यां बाजारपेठ खरेदीदारांची बनलेली आहे. अशा परिस्थितींत, जास्त प्रकारांचें कापड हातमागांसाठी राखुन ठेवण्यांत आलें तर इतर प्रकारचें कापड जास्त काढूनच गिरण्या चालू ठेवाव्या लागतील. हें इतर प्रकारचें कापड विणकराहि तयार करीत असतात. म्हणजे, गिरण्यांचें उत्पादन तरी पडून राहील, नाहींतर हातमागांचें उत्पादन तरी कमी करावें लागेल. कृत्रिम रीतीनें, कापडाच्या उत्पादनाचें क्षेत्र हातमागासाठी राखून ठेवल्यानें विणकरांना काम मिळालें तर गिरण्यांचें उत्पादन कमी होऊन तेथें रोजगार कमी होऊनच तें मिळेल हें उघड आहे. "

---

पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., पुणें शहर

## नोटीस

पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या सन १९५२-५४ सालच्या हिशेबांची तपासणी करण्याकरितां येत्या वार्षिक साधारण सभेंत दोन हिशेब तपासनीसांची नेमणूक करावयाची आहे. तरी सदर कामासाठी ज्यांना उमेदवार म्हणून उभे रहावयाचे असेल त्यांनीं आपले अर्ज बँकेच्या मुख्य कचेरींत शुक्रवार दिनांक ३१ जुलै १९५३ रोजीं दुपारीं चार वाजण्यापूर्वी दाखल होतील अशा बेतानें पाठवावेत.

उमेदवारांनीं अर्जांत आपलें संपूर्ण नांव, पत्ता व लायकी नमूद केली पाहिजे.

हिशेब तपासनिसांचे नेमणुकी संबंधीचे नियम बँकेचे मुख्य कचेरींत कामाचे वेळांत पहावयास मिळतील.

पुणें शहर — मो. वि. रखडे

दिनांक १३-७-५३ — मॅनेजिंग डायरेक्टर

### कस्तुरबा गांधी ट्रस्ट

वरील ट्रस्टनें आतांपर्यंत, गेल्या सात वर्षांत, त्याच्या उद्दिष्ट प्राप्तीसाठी ४३,८३,१०३ रु. खर्च केले आहेत. १२,८९,९८९ रु. चा भांडवली खर्च झाला आहे, तो वेगळाच. १९५३ साठी १७,९०,३४० रु.चें अंदाजपत्रक ट्रस्टींनीं मंजूर केलें आहे.

---

### राज्य सरकारांची कर्जउभारणी

दहा राज्य सरकारांनीं मिळून एकूण २८ कोटी रुपयांचीं कर्जे उभारण्याचें ठरविलें आहे. १५ जुलै रोजीं अर्ज स्वीकारले जातील व २३ जुलै रोजीं अर्ज स्वीकारणें बंद होईल. फक्त मद्रास सरकारच्या अर्जाची मुदत ३१ जुलै अखेर आहे. ४% व्याज व १० वर्षे मुदत सर्व कर्जांस लागू आहे. मुंबई व प. बंगाल सरकारांची कर्जे दर्शनीं किंमतीस मिळतील. इतर कर्जांची शेंकडा किंमत ९९ रु. ८ आ. राहील. कर्जांचा तपशील खालीं दिला आहेः—

| राज्य | कर्जाची रक्कम (लक्ष रु.) | किंमत (%) |
|---|---|---|
| बिहार | १०० | ९९-८ |
| मुंबई | ५०० | १०० |
| मध्यभारत | १०० | ९९-८ |
| मध्यप्रदेश | १०० | ९९-८ |
| मद्रास | ५०० | ९९-८ |
| म्हैसूर | ३०० | ९९-८ |
| सौराष्ट्र | १०० | ९९-८ |
| त्रावणकोर-कोचीन | ३०० | ९९-८ |
| उत्तरप्रदेश | ५०० | ९९-८ |
| प. बंगाल | ३०० | १०० |

ह्या कर्जांच्या अटी पैसे गुंतविणारांच्या दृष्टीनें, गेल्या वर्षींच्या कर्जांच्या अटींपेक्षां ज्यास्त सोईच्या आहेत. कर्जांची मुदत १२ वर्षांऐवजीं १० वर्षे आहे आणि मुंबई व बंगाल वगळून बाकीच्या कर्जांची किंमत ८ आण्यांनीं कमी आहे. गेल्या वर्षी १२½ कोटी रुपयांची कर्जाची मागणी होती, आतां ती २८ कोटींची आहे.

---

### बँक ऑफ इंडियाचा नफा

बँक ऑफ इंडिया लि. ला ३० जून, १९५३ अखेर संपलेल्या सहामाहींत ३६,१०,५६५ रु. नफा झाला भागीदारांना २,५०,००,००० रु. भाग भांडवलावर १२% करमाफ इंटेरिम डिव्हिडंड देण्यासाठी १५,००,००० रु. चा विनियोग केला जाईल.

---

पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., पुणें शहर

## नोटीस

पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या सन १९५३-५४ च्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्सची निवडणूक व्हावयाची आहे. त्यासाठी मतदारांची यादी तयार झाली असून ती बँकेच्या मुख्य कचेरींत व शाखा कचेऱ्यांतून नोटीस बोर्डावर निवडणूक नियम नं. ३ प्रमाणें लावण्यांत आली आहे.

तरी निवडणुकीसाठी लायक उमेदवारांचीं नांवें सूचक व अनुमोदक यांच्या सहीसह व उमेदवाराच्या लेखी संमतीनें सोमवार दिनांक १० ऑगस्ट १९५३ रोजीं दुपारीं चार वाजण्यापूर्वी बँकेच्या मुख्य कचेरींत दाखल होतील अशा बेतानें पाठवावीत.

सदर बाबत कोणास जास्त माहिती पाहिजे असल्यास ती बँकेच्या मुख्य कचेरींत ऑफिसचे वेळांत मिळूं शकेल.

पुणें शहर, — मो. वि. रखडे

दिनांक १३-७-१९५३ — मॅनेजिंग डायरेक्टर

## नॅशनल सेव्हिंग्ज बँकेच्या वायंडिंगअपचा हुकूम

### स्कीम ऑफ अरेंजमेंटला नकार

पोपटलाल खेतसीभाई ह्यांनीं कानजी करसोनदास ह्यांच्या नांवें नॅशनल सेव्हिंग्ज बँकेवर १,१४३ रु. १५ आ. ६ पै चा चेक काढला होता. परंतु, पैसे देण्याचें तहकूब केलें आहे, असें कारण देऊन बँकेनें चेकची रक्कम देण्याचें नाकारलें. म्हणून, बँक गुंडाळण्यांत यावी, असा त्यांनीं अर्ज केला. त्यावरून, न्यायमूर्ति देसाई ह्यांनीं ऑफिशिअल लिक्विडेटरला बँकेचें लिक्विडेटर नेमून बँकेच्या वायंडिंगअपचा हुकूम केला. पुढें, बँकेच्या अर्जावरून, न्यायमूर्तींनीं बँकेच्या धनकोंची व भागीदारांची "स्कीम ऑफ अरेंजमेंट"चा विचार करण्यासाठीं सभा बोलवावी, असा हुकूम केला. बँकेनें सुचविलेल्या योजनेचा तपशील असा होता:—२१ एप्रिल रोजीं प्रत्येक ठेवीदाराच्या खात्यावर असलेली रक्कम १५% नें कमी करून उरलेली ८५% रक्कम खालील प्रमाणें परत करण्यांत यावी:—(अ) स्कीमला कोर्टानें मंजुरी दिल्यानंतर ३ महिन्यांचे आंत ४०% (ब) वरील मुदत संपल्यानंतर ४ वर्षांचे आंत उरलेली ४५% रक्कम—मात्र कोणत्याहि एका वर्षांत १०% पेक्षा कमी दिली जाणार नाहीं. (क) १०० रु. पर्यंतच ठेवी असणाऱ्या ठेवीदारांना ७५% रक्कम देऊन टाकण्यांत यावी. त्यांना नंतर कसलाहि शिलकी नफ्यांत हिस्सा मागण्याचा किंवा शेअर्स मिळण्याचा अधिकार रहाणार नाहीं. (ड) ह्यानंतर वसूल झालेली रक्कम बँकेच्या धनकोंना प्रमाणशीर वाटून यावी. बँकेचें सध्याचें वसूल भांडवल ६६⅔% नें कमी करण्यांत यावें, म्हणजे तें सुमारें १०,७५,००० रु. उरेल. कोर्टानें स्कीम मंजूर केल्यावर बँकेनें तिचा नेहमींचा बँकिंगचा व्यवहार सुरू करावा. ह्या नव्या व्यवहाराचे हिशेब स्वतंत्र ठेवण्यांत यावे. ३१ डिसेंबर, १९५७ अखेर पर्यंत डिव्हिडंड दिलें जाऊं नये.

बँकेच्या वरील "स्कीम ऑफ अरेंजमेंट"ला कांहीं धनकोंनीं विरोध केला; त्यांचें म्हणणें, बँकेची स्थिति ऋण फेडण्यास क्षम नाहीं. ठेवीदारांचें देणें बँक ठरल्यावेळीं देऊं शकेल, अशी कोर्टाची खात्री झाली, तरच त्यानें वायंडिंग-अपचा अर्ज स्थगित करावा, अशी बँकिंग कंपन्यांच्या कायद्याच्या ४० व्या कलमांत तरतूद आहे. नियोजित सभा बोलावण्यापासून कांहींहि फायदा होणार नाहीं, असेंहि त्या धनकोंनीं सांगितलें. हायकोर्टानें नॅशनल सेव्हिंग्ज बँकेच्या वायंडिंगअपचा हुकूम केला.

## टाटा हैड्रो-इलेक्ट्रिक कंपन्यांची भांडवल उभारणी

मुंबई-पुणें विभागास वीज पुरविणाऱ्या टाटा गटाच्या तीन कंपन्यांनीं मिळून—टाटा हैड्रो, टाटा पॉवर व आंध्र व्हॅली—३ कोटी रुपयांचें नवें भाग-भांडवल उभारण्याचें ठरविलें आहे, व त्यासाठीं त्या तीन कंपन्यांच्या विशेष साधारण सभा बोलविण्यांत आल्या आहेत. ट्रॉम्बे येथील थर्मल वीज निर्मिति केंद्राच्या उभारणीस सुमारें १३ कोटि रु. खर्च येणार आहे. ट्रॉम्बे येथील तेलशुद्धीच्या दोन नव्या कारखान्यांत दरसाल १३ कोटि यूनिट्स वीज खपूं लागेल, त्यासाठीं हें १ लक्ष किं. वॅ. शक्तीचें वीजनिर्मिति केंद्र उभारण्यांत येत आहे. १३ कोटी रु खर्चापैकीं ७ कोटी रु. इंटर नॅशनल बँकेकडून कर्जाऊ घ्यावे, ३ कोटी रु. बँकांकडून तात्पुरतें कर्ज काढावें व ३ कोटि रु. किंमतीचे नवे भाग तीन कंपन्यांनीं विकावे, अशी १३ कोटींची तरतूद केली जाणार आहे. पूर्वतयारी सर्व झाली असून केंद्र उभारणीच्या कामाचीं टेंडर्स मागविण्यापर्यंत व्यवस्था झाली असल्यानें आतां प्रत्यक्ष रकमच हवी आहे. म्हणून भांडवल वाढीच्या तयारीस कंपन्या लागल्या आहेत.


# दि सांगली बँक लिमिटेड

## सांगली

(स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक)

## मुख्य ऑफिस : सांगली

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रुपये १०,००,००० |
| वसूल भांडवल | रुपये ४,५०,००० |
| रिझर्व व फंड्स | रुपये ४,९०,००० |
| वर्किंग फंड्स | रुपये एक कोटीवर |

: शाखा :

मुंबई, शहापूर, तेरदळ, रबकवी, शिरहट्टी, मंगळवेढें, कवठें, कराड, उगार, विलिंग्डन कॉलेज, इचलकरंजी.

सांगली येथें सेफ् डिपॉझिट व्हॉल्टची व्यवस्था आहे. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. आर. व्ही. देशमुख, B. A., B. Litt. (Oxon) (चेअरमन) कलेक्टर, साउथ सातारा.

(१) श्री. नेमचंद रावजी शहा (२) श्री. भूपालराव अनंत आरवाडे (३) श्री. पुरुषोत्तम गोकुळदास, (४) श्री. गुंडप्पा बाबाजी आरवाडे, (५) श्री. तात्यासाहेब श्रीमंधर आरवाडे, (६) श्री. मारुतीराव रामचंद्र जाधव.

एम्. के. ग्रुसे,
एम्. ए., सी. ए. आय. आय. बी.
मॅनेजर

# दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

९, बँक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.
स्थापना १९११

टेलिफोन नं. २५४६१, ३१,६८६ | पोस्ट बॉक्स नं. ४७२, तारेचा पत्ता : फार्मरबँक

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगासाठीं दिला जातो.

| | |
|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल | |
| भागीदारांतर्फे | रु. ३३,२५,४०० |
| मुंबई सरकारतर्फे | रु. १६,००,००० |
| | रु. ५९,२५,४०० |
| गंगाजळी व फंड | रु. ४३,२८,९०० |
| ठेवी | रु. ८,५४,८१,४०० |
| खेळतें भांडवल | रु. १०,८५,०२,२०० |

## १५ जिल्ह्यांत ६३ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

वा. पुं. वर्दे,
ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, एम्. ए. यांनीं 'दुर्गानिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.